**नि.दि.मु.क्र. ७९/२०१६ मधील नि.क्र. २५ वरील आदेश**

प्रस्तुतचा दावा आज्ञार्थी ताकीद हुकूम मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि.क्र. १ वरील त्यांच्याविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जातील प्रतिवादी क्र. १ व २ यांचे थोडक्यात कथन असे आहे की, दि. १६/०१/२०१७ रोजी सदर प्रतिवादींविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ याने सरपंच या पदाच्या पदाभारातून सुट्टी घेतलेली होती व त्यामुळे त्यांना आपली कैफियत दाखल करता आली नाही. तसेच प्रतिवादी क्र. २ ग्रामसेवक असून; सदर पदभार असलेल्या व्यक्तीची बदली झाल्याने त्यांना आपल्या विधीज्ञाशी संपर्क साधून कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही. त्यांची कैफियत याकामी दाखल होणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था असून; लोकहिताची कामे करीत असते. दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्याकरीता सदर प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची संधी देण्यात यावी. त्यांनी त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सबब वर नमूद आदेश रद्दबातल करण्यात येवून अर्ज मंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, प्रतिवादींना ब—याच वेळा संधी मिळूनही त्यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. यावरुन त्याचा निष्काळजीपणा दिसून येतो. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या कैफियतीशिवाय चालविण्यात यावा असा आदेश नि.क्र. १ वर

दि. १६/०१/२०१७ रोजी माझ्या पुर्वाधिका—यांनी निर्गमित केलेला असून; सदरील आदेश रद्दबातल होवून मिळण्यासाठी प्रतिवादींनी दि. १९/०९/२०१७ रोजी अर्ज दाखल केल्याचे दिसते.

०५. अर्जातील संपूर्ण मजकूर पाहता; प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कोणतेही एक संयुक्तीक सबळ कारण नि.क्र. १ वरील दि. १६/०१/२०१७ रोजीचा आदेश रद्दबातल होवून मिळण्यासाठी दिलेले नाही हे स्पष्ट होते यावरुनच अर्ज मोघमपणे दाखल करण्यात आला असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. १ व २ यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झाला असल्याचे स्पष्ट होते. तथापि; दाव्यातील मागणी लक्षात घेता; वादीने प्रतिवादींविरुध्द घर क्र. १४१ या मिळकतीच्या कर आकारणी रजिस्टरला संभाजी वाईरकर यांचे रद्द केलेले नाव पुर्वस्थितीत आणून त्यांचे नाव मालकसदरी नोंद करण्याकरीता आज्ञार्थी ताकीद हुकूम होवून मिळणेची दाव्यातील मागणी सादर झालेली आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांचा बचाव मांडण्याची आणखी एक संधी कायद्याने मिळणे जरुरीची आहे. परंतु कैफियत दाखल करण्यास केलेला विलंब लक्षात घेता त्यांच्यावर रक्कम रु. ५००/— (रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीला देवू करुन अर्ज मंजूर करावा लागेल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यावर रक्कम रु. ५००/— (रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. १६/०१/२०१७ रोजीचा प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीला पुढील तारखेस अथवा

 **नि.दि.मु.क्र. ७९/२०१६ मधील**

**नि.क्र. २५ वरील आदेश**

तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—११ ऑक्टोबर, २०१७ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.